# फ्लिपकार्टने घरपोच डिलिव्हरीसह पुण्यात आणले सुरक्षित आणि विनाअडथळा ग्रोसरी शॉपिंग

- पुण्यातील समर्पित ग्रोसरी फुलफिलमेंट सेंटरमुळे स्थानिक रोजगाराला चालना मिळेल आणि स्थानिक शेतकऱ्यांना विस्तारित बाजारपेठ जोडणीच्या लाभासह स्थानिक विक्रेत्यांना अधिक व्यापक बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यास मदत
- घरापर्यंतच्या सुरक्षित डिलिव्हरीसह पुणे आणि औरंगाबादच्या ग्राहकांना किफायतशीर दरात मिळणार उच्च गुणवत्तेची दैनंदिन गरजेची ग्रोसरी
- दैनंदिन गरजेच्या वस्तूंपासून धनधान्य, स्नॅक्स, पेय, कन्फेक्शनरी, पर्सनल केअर अशा विविध श्रेणींतील ७ हजारांहून अधिक उत्पादने उपलब्ध

**पुणे, 16 एप्रिल 2021 :** भारतातील एतद्देशीय फ्लिपकार्ट समूहाने पुण्यात ग्रोसरी सेवेचा शुभारंभ केला असून त्यामुळे शहरातील ग्राहकांना आता सुरक्षित स्वरुपातील घरपोच डिलिव्हरीसह किफायतशीर किमतीत उच्च गुणवत्तेच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू उपलब्ध होणार आहेत.

फ्लिपकार्ट ग्रोसरीच्या माध्यमातून दैनंदिन गरजेच्या वस्तू, धनधान्ये, स्नॅक्स आणि पेय, कन्फेक्शनरी, पर्सनल केअर यांसारख्या, विविध अशा २००हून अधिक श्रेणींतील ७ हजारांहून अधिक उत्पादने उपलब्ध होणार आहेत. फ्लिपकार्टच्या ग्रोसरी ऑफरिंगला व्हॉइस एनेबल्ड शॉपिंग फॉर ग्रोसरीज, क्रेडिट ऑफरिंग्ज आणि ओपन बॉक्स डिलिव्हरीजच्या माध्यमातून इंट्यूटिव्ह यूजर एक्स्पिरिअन्सचे पाठबळ लाभले आहे.

फ्लिपकार्टचा हा नवा शुभारंभ आणि पुण्यातील समर्पित ग्रोसरी फुलफिलमेंट सेंटरमुळे पुणे, तसेच लगतच्या औरंगाबादमधील वापरकर्त्यांना सॅटेलाइट-विस्तारित मार्केटप्लेस मॉडेलच्या माध्यमातून सुलभ ऑनलाइन ग्रोसरी शॉपिंगचा लाभ होईल. या प्रदेशातील ६०हून अधिक पिनकोड्सवर या माध्यमातून सेवा पुरवण्यात येणार आहे.

सुमारे ७२ हजार चौरस फुटांमध्ये पुण्यातील ग्रोसरी फुलफिलमेंट सेंटर असून दिवसाला सहा हजारहून अधिक ऑर्डर्स हाताळण्याची त्याची क्षमता आहे. या केंद्रामुळे एक हजाराहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या असून यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती व अर्थव्यवस्थेला बळ मिळाले आहे.

**फ्लिपकार्टच्या ग्रोसरी विभागाच्या उपाध्यक्ष स्मृती रविचंद्रन** म्हणाल्या, *"पुणे आणि औरंगाबादमध्ये ग्रोसरी सेवा आणताना आम्हाला आनंद होत आहे. दर्जेदार खाद्यान्न आणि घरगुती गरजेच्या वस्तूंच्या मागणीत वाढ होत असल्यामुळे ग्रोसरी ही आमच्यासाठी सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या श्रेण्यांपैकी एक आहे. देशभरातील आमच्या ग्रोसरी व्यवसायाची व्याप्ती वाढवण्यासाठीही आम्ही गुंतवणूक केली असून भागिदारी परिसंस्थेच्या बळकटीकरणातून व्यापक उत्पादन निवड, सुदृढ पुरवठा साखळी आणि ग्राहकांसाठी सुरळीत*

*इन एप अनुभव याद्वारे विनाअडथळा ग्रोसरी शॉपिंग एक्स्पिरिअन्स मिळेल, याची खात्री केली आहे. गेल्या वर्षभरात द्वितीय श्रेणी शहरातूनही आम्हाला ग्रोसरीच्या मागणीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. आपल्या घरातील सुरक्षित आणि आरामदायी वातावरणातून संपर्कहीन खरेदीला ग्राहकांचे वाढते प्राधान्य मिळत असल्यामुळे ही मागणी वाढत आहे..”*

ई-कॉमर्स हे खरेदीचे सुरक्षित साधन म्हणून उदयाला आले असून मार्केटप्लेसवरील ग्रोसरीच्या या शुभारंभामुळे पुणे आणि औरंगाबादमधील ग्राहक, ई-कॉमर्सचा प्रथमच वापर करणाऱ्या ग्राहकांच्या ई-ग्रोसरी गरजा भागवण्याच्या फ्लिपकार्टच्या क्षमतेला बळकटी मिळेल.

महामारीच्या या संपूर्ण काळात पुरवठा साखळी, डिलिव्हरी एग्झिक्युटिव्हज आणि ग्राहकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी फ्लिपकार्ट समूह सातत्याने प्रयत्नशील आहे. देशभरातील ग्राहकांना होणाऱ्या घरपोच डिलिव्हरीमुळे ग्राहकांना उत्पादन खरेदीसाठी घराबाहेर पडण्याची गरज उरली नसून आमच्या हजारो डिलिव्हरी हिरोंनी या ग्राहकांना सुरक्षित ठेवण्याचे काम केले आहे. त्याचबरोबर, लाखो विक्रेते/एमएसएमईंसाठी आपली उत्पादने विकण्यासाठी चैतन्यशील अशी बाजारपेठ उपलब्ध करून आणि त्यायोगे अत्यंत गरजेच्या अशा रोजगारसंधी निर्माण करून फ्लिपकार्टला हे विक्रेते व एमएसएमईंना मदत करणेही शक्य झाले आहे. अलिकडे कोरोनाबाधित रुग्णांचे आकडे पुन्हा वाढू लागले असून या पार्श्वभूमीवर फ्लिपकार्ट गेल्या अनेक महिन्यांच्या अनुभवातून विकसित व रूढ झालेली सुरक्षितता व अन्य एसओपींचे पालन करत आहे.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com**